प्रकाश गोळे

# निसुकळे!

सुंदर पक्षी, रंगीत पक्षी, गोड गाणारे पक्षी, अद्भुत नाचणारे पक्षी, बलाढ्य, पॉलरबाज शिकारी पक्षी! या सगळ्यांना हौसे नौसे चाहते आहेत. कोणी मोरपिसाऱ्यानं हरखून जातात, कोणी दयाळ-यांच्या, शामाच्या, हळद्यांच्या, आयो-राच्या गोड गळ्यावर लुब्ध होतात; कोणाला स्वर्गीय नर्तकाची, मागे लळणारी लांब शेपटी भुरळ घालते तर कोणी रोहित पक्ष्यांच्या गुलाबी माळा आकाशात दिसू लागल्या की थक्क होऊन पाहत राहतात. अनकडबाज चोचीला आणि तीक्ष्ण नजरेच्या गरुड किंवा तिरसारख्या हवा कापीत जाणाऱ्या ससाण्या पाहिल्याशिवाय ज्यांना चैन पडत नाही, असेही पक्षीनिरीक्षक मी पाहिले आहेत.

माझ्या नजरेला खिळवीत ठेवणारे पक्षी मात्र आहेत निसुकळे! नजर ठरू न देणारे, क्षणात पानाआड दडणारे, फांदी आड दडणारे, सुळकन सूर मारून झुडुपात गडप होणारे, पाना-पाचोळ्यांच्या गर्द जाळीतून सूर उमटविणारे, डोळे फाडफाडून पाहिलं तरी अदृश्य राहून बिनधास्त अस्तित्व दाखविणारे हे निसुकळे, पाहणं आणि ओळखणं हे खरोखरीच आव्हान आहे, पक्षीनिरीक्षकाला सतत खुणावणारं, चुळबुळत ठेवणारं कोडं आहे.

पावसाळा संपत आला की या निसुकळ्यांचं अस्तित्व खूप खूप जाणवू लागतं. कधी झाडीतून अचानक एक ठळकारी कानांवर आदळून चुकनं पाऊल थबकविते. कधी रस्त्याकडेच्या झुडुपां-तून टेंव् येणारी झुक् झुक् ओळख पटून जाते. झाडात नजर टाक-लीत तर कोणीच दिसत नाही. पण जिथं नजरेची रिघ पडेल, तिथून चुकतंच कोणीतरी उडून गेल्याचं, नाहीसं झाल्याचं मात्र जाणवत राहील. नजरेनं शोध घेण्याचा अट्टाहास केलात तर खूप चोचींचं टोक, पंखाची कड, शेपटीचं टोक पुसटसं दिसून

अस्तित्व झाल्याचं जाणवत राहील. एवढी मात्र खात्री पटेल की चिमुकले आपल्या परिसरात येऊन दाखल झालेत! कठोर तपश्चर्या केल्याशिवाय दर्शन न देणाऱ्या एखाद्या उपास्य दैवतासारखंच या चिमुकल्यांचं पूर्ण दर्शन होण्यासाठी बरीच वणवण तुम्हाला करावी लागेल.

कोण आहेत हे चिमुकले? इंग्रजीत "वॉब्लर" या सर्वसाधारण नावाने ओळखले जाणारे पण मराठीत कोणतंच समर्पक नाव नसलेले हे पक्षी बहुतेक निरीक्षकांच्या नजरेच्या कक्षेबाहेर राहूनच दडलेले दिसतात. त्यांची ओळख पटवून घेण्याची निकड फारशी कोणाला वाटत नाही, तेवढी चिकाटी फारशी कोणी दाखवीत नाही. ना रंग, ना रूप, ना आकार, ना गंध; मग अशा पक्ष्यांच्या वाटेला जाणार कोण? बरं, तुम्ही त्यांची ओळख करून घ्यायचं ठरविलंत तर त्यांना बघणं इतकं जबरदस्त की कशाला या फंदात पडलो, असं तुम्हाला ते वाटायला लावणार! पण या बघण्याची ओढ अशी जबरदस्त आहे की मला त्यांना निरखून पुरतं पाहिल्याशिवाय राहवत नाही. आताच पहा ना, माझ्या खोलीबाहेरच्या झुडुपझाडात मला कोणाची तरी हालचाल जाणवतीय. फांद्यांच्या पसाऱ्यातून त्याचं ओझरतं दर्शन होईल म्हणून मी डोळे लावून बसलो आहे. त्याच्या वावरण्यानं होणारी पानांची अस्पष्ट हालचाल माझी नजर गुंतवून ठेवती आहे. पाच-दहा मिनिटं झाली, पण अजून त्याच्या पिसाचं टोकसुद्धा मला दिसलेलं नाही. पण मी आशा सोडलेली नाही. एवढ्यात झुडुपातून त्याचा शब्द ऐकू येतोय — च्युक्..... मग थोड्या सेकंदाने पुन्हा च्युक्! माझ्या मनात ओळखीच्या अस्पष्ट खुणा उमटतेय. पण हा का तो? निर्णय होत नाहीये! इतक्यात त्याची हिरवट तपकिरी पाठ नजरेत येतीय. पण मी शोधतोय त्याची शेपूट, तिचा आकार.

आला. त्यावर पुसटशी पांढरी रेघ वाटतेय. डोळ्यातून काळी रेघ मात्र गेलेली नाही; आणि पंखावरही पट्टा नाही. त्याची काळपट टोकं जाणवताहेत.

कोण असावा हा? दोहोंपैकी एक असण्याची शक्यता – ब्लाइथ्स रीड वॉर्बलर असावा किंवा बूटेड वॉर्बलर असावा. दोन्हीही स्थलांतरीत. पहिला थेट सायबेरियापासून हिमालयापर्यंतचा रहिवासी आणि दुसरा उत्तर रशियापासून मध्य आशियापर्यंतच्या प्रदेशांचा रहिवासी. पहिला हिमालयाच्या दक्षिणेकडील साऱ्या भारतभर हिवाळा घालविणारा तर दुसरा मुख्यत: द्वीपकल्पीय भागात हिवाळ्यात येणारा. दोघांच्या सवयी सारख्याच. झाडांपेक्षा दाट झुडुपं पसंत करणार आणि चुक् चुक् चुर्र्र करीत त्यात वावरणार – पक्षी-निरीक्षकांच्या नजरेला सतत हुलकावण्या देत! मग दोघा जुळ्यातून एकाला नेमकं ओळखण्याची खूण कोणती!

आता निरनिराळी पुस्तकं चाळा. त्यांतली रंगीत चित्रं नीट न्याहाळा. नक्की नाही, पण माझ्या समोरचा हा पक्षी ब्लाइथ्स रीड वॉर्बलरच वाटतोय. त्याला भुवई अशी नाहीच, याउलट बूटेड वॉर्बलरला निदान थोडी तरी भुवई दिसतेय; शिवाय उन्हाळ्यात ती पुसटशी नाहीशीसुद्धा होतेय! पण पहिला कोठेही दिसतो, तर दुसरा मुख्यत: पाण्याजवळ आढळतो – नदीकिनारी, तळ्याकाठी, ऊंच गवतात. यांपैकी आपल्या इथे कोणतीच गोष्ट नाही. पण हौद मात्र आहे आणि त्यात पाणीही आहे. त्या पाण्यानं ओढून आणलं असेल का इथवर बूटेड वॉर्बलरला? नाही! त्याला नदी किंवा तळंच हवं असणार. मी आता पाहतोय तो ब्लाइथ्सच.

मी मनाचं समाधान करतो. मनातली शंकेची पाल दडपून टाकीत. एव्हांना ती स्वारी अंतर्धान पावलेली असते. "असेच सटवाळ, नतद्रष्ट आहेत हे चिमुकले," मी मनाशी उद्गारतो.

आज मी नशीबवान असेन कारण तर त्याला नेहमीची शोधतोय मी नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यांत दरवर्षी जो आमच्या बागेत येतो, तोच असेल का हा पक्षी?

आणखी काही मिनिटे अशीच उत्कंठा वाढविणारी आणि अचानक समोरून उडी घेत तो समोरच्या फांदीवर येऊन - माझ्याकडे पाठ करून! पण स्वारी स्थिर नाही, पाठ इकडे-तिकडे हलतीय, शेपूट किंचित खालीवर होतीय. मी पाहतोय शेपूट टोकाशी जोडलेली आहे का, किंचित दुभागलेली आहे? शेपूट एक क्षणभर स्थिर नाही, पण तिचं टोक दुभागलेलं वाटत नाही, सरळ असावं. नाही, एक दुसरा मिळाला. रंग कोणता आहे? खालून हिरवा आणि किंचित तपकिरी झाक असलेला. अजून त्याची पाठच आहे माझ्याकडे. त्यामुळे पंखांची कड, चेहरा पाहायला मिळत नाही. पण एकंदरीत स्वारी खालीच अहंमग्न! स्वतःच्या फांद्यांच्या गर्दीत जाळीत झालेली प्रसार. अजून थांबायला पाहिजे म्हणून. कदाचित एखाद्या जोरकसा पाठमोऱ्यावर पुन्हा अवतीर्ण होऊ शकेल.

आणखी काही उत्कंठापूर्ण मिनिटे. चुक चुक असा पुन्हा आवाज. आणि पाठोपाठ स्वतःच स्वारी उगवली, सोबती जवळ माझ्याकडे तोंड करून. सुदैवाने त्याची नजर माझ्याकडे वळलेली नाही. कशाला नाहीतर थांबतोय तो! समोरून पोट व गळ्याचा रंग पांढरा नाही की काळाही नाही, असा दिसतोय. पण चेहरा? मला त्याचं "प्रोफाईल" बघायचंय. त्याला भुवई असेल की नाही! डोळ्यातून काळी रेघ असेल का? तो कशाने सजवलेला? स्थिर तो राहील का? आणि पंख? पंखावर पट्टे असतील का नसतीलच? एक असेल की दोन? त्यांचा रंग पांढरा असेल का पिवळा?

अरे! स्वतःच थोडा वळला तो! आता त्याचा डोळा नजरेत